महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257-2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 30 एप्रिल, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 01 मे, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/१८४ दिनांक 01 मे, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्‌घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्‌घातात नमूद महाराष्ट्र शासन यांचेकडील सुधारीत आदेश दिनांक 30 एप्रिल, 2020 अन्वये लॉकडाऊन कालावधीत विविध राज्यात, जिल्हयात अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना जळगांव जिल्हयातून त्यांच्या इच्छित स्थळी (आंतरराज्य, राज्यांतर्गत) जाण्यासाठी व जळगांव जिल्हयात येण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन उपोद्‌घातातील **नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 30 एप्रिल, 2020 व दिनांक 01 मे, 2020 अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

1) **जळगांव जिल्हयात अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना त्यांचे इच्छित स्थळी जाण्यासाठी** आवश्यक असलेली परवानगी देण्याकरीता **श्री रविंद्र भारदे, उपजिल्हाधिकारी, महसूल प्रशासन** यांची **नोडल अधिकारी** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सदर कामकाजासाठी नोडल अधिकारी यांना सहायक कर्मचारी म्हणून i) श्री योगेश पाटील, अव्वल कारकून, कुळकायदा शाखा ii) श्री योगेश पाटील, सहायक चिटणीस, आस्थापना शाखा iii) श्री घनश्याम सानप, अव्वल कारकून, आस्थापना शाखा, iv) श्री सुधीर सोनवणे, अव्वल कारकून, अलेप शाखा सर्व जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

2) जळगांव जिल्हयात अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना त्यांचे इच्छित स्थळी जाण्यासाठी परवानगी देत असताना, नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी व कर्मचारी यांनी जळगांव जिल्हयातून बाहेर जाण्याकरीता प्राप्त झालेल्या सर्व अर्जांचे राज्य निहाय, जिल्हा निहाय वर्गीकरण करावे व दिवसातील ठराविक वेळा निर्धारीत करुन प्राप्त झालेले सर्व अर्ज संबंधित जिल्हाधिकारी यांना त्या-त्या वेळी ई मेल वर सादर करावेत. तसेच ज्या जिल्हाधिकारी यांना सदरचे ई मेल पाठविण्यात आलेले आहेत, त्यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसारच पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. त्याच प्रमाणे दररोज प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद नोंदवहीत ठेवण्यात यावी.

3) **जळगांव जिल्हयात** अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांनी त्यांचे इच्छित स्थळी जाण्याची परवानगी मिळण्याकरीता त्यांनी **www.jalgaon.gov.in** या संकेतस्थळावर जाऊन covid19 या टॅबवर जाऊन दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक ती माहिती विहीत नमुन्यात अचूकरीत्या भरावी.

4) **जळगांव जिल्हयातील स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती हे बाहेर जिल्हयात/ राज्यात अडकून पडलेले आहेत,** अशा नागरीकांना जळगांव जिल्हयात येण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही करण्यासाठी **श्री किरण सावंत पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी, जळगांव** यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सदर कामकाजासाठी नोडल अधिकारी यांना सहायक कर्मचारी म्हणून i) श्री प्रविण भिरुड, अव्वल कारकून, भुसंपादन शाखा ii) श्री किशोर पवार, अव्वल कारकून, भुसंपादन शाखा iii) श्री पाराजी बोबडे, लिपीक, भुसंपादन शाखा सर्व जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

5) जळगांव जिल्हयातील रहिवासी असलेले परंतु इतर जिल्हयात, राज्यात अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांनी त्यांची आवश्यक माहिती **plaqjalgaon@gmail.com** या ईमेल वर सादर करावी.

6) जळगांव जिल्हयातील स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती हे बाहेर जिल्हयात/ राज्यात अडकून पडलेले आहेत, अशा नागरीकांना जळगांव जिल्हयात येण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी व कर्मचारी यांनी दररोज **plaqjalgaon@gmail.com** या ईमेल वर प्राप्त झालेल्या सर्व संदर्भ / ईमेल / अर्ज यांची छाननी करुन सदरचे अर्ज सर्व संबंधित जिल्हाधिकारी / राज्य स्तरीय नोडल अधिकारी यांना सादर करावेत. तसेच जळगांव जिल्हयात येण्याकरीता परवानगीसाठी मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेले ईमेलची तपासणी करुन त्यांना मंजूरी देण्याची कार्यवाही करावी व सदर मंजूर करण्यात आलेल्या व्यक्तींची यादी जळगांव जिल्हयातील संबंधित तहसिलदार यांना तात्काळ पुरवावी. तसेच याबाबतचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेऊन त्याचा दैनंदिन गोषवारा काढण्यात यावा.

7) ज्या नागरीकांनी जळगांव जिल्हयातून बाहेर जिल्हयात अथवा राज्यात जाण्याच्या परवानगीसाठी अर्ज सादर केलेले आहेत अशा नागरीकांना ज्या जिल्हयात जायचे आहे त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची परवानगी / मंजूरी या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच या कार्यालयामार्फत जळगांव जिल्हयातून जाण्यासाठीचे पासेस निर्गमित करण्यात येतील. सदरचे पासेस अर्जदारांना त्यांचे ईमेल वर प्राप्त होतील.

8) ज्या नागरीकांना वरील प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे शक्य नाही, त्यांनी ते ज्या ठिकाणी आहेत त्या क्षेत्रातील संबंधित तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालयात समक्ष जाऊन विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. संबंधित तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी अशी परवानगी देण्याकामी आपले कार्यालयात स्वतंत्र परवानगी कक्ष स्थापन करावा. ऑफलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांची माहिती **www.jalgaon.gov.in** या संकेतस्थळावर अचूकरीत्या भरावी. तसेच अशा प्रकारे

Scanned with CamScanner

प्राप्त झालेल्या अर्जांचे स्वतंत्ररीत्या नोंदवही ठेवावी व दैनंदिन गोषवारा काढून त्याची प्रत दररोज नोडल अधिकारी श्री रविंद्र भारदे, उपजिल्हाधिकारी, महसूल प्रशासन यांना सादर करावी.

9) **जळगांव जिल्हयात जाहिर करण्यात आलेल्या Containment Zone मधील कोणत्याही नागरीक / व्यक्ती यांना जळगांव जिल्हयातून बाहेर जाण्यास तसेच कोणत्याही नागरीक / व्यक्ती यांना सदरील Containment Zone मध्ये येण्याची परवानगी असणार नाही.**

10) इतर राज्यात व जिल्हयात जाहिर करण्यात आलेल्या Containment Zone मधील नागरीक / व्यक्ती यांना जळगांव जिल्हयात प्रवेश असणार नाही.

11) **जळगांव जिल्हयातून बाहेर जाण्याकरीता व जळगांव जिल्हयामध्ये येण्याकरीता अर्ज करणा-या प्रत्येक व्यक्ती / नागरीक यांना त्यांच्या अर्जासोबतच नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायीक (नोंदणीकृत डॉक्टर्स) यांनी अर्जदाराला कोणत्याही प्रकारचे Influenza आजारा सारखी लक्षणे आढळून येत नसल्याबाबत प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

12) बाहेरील राज्यातून तसेच जिल्हयातून जळगांव जिल्हयात येणा-या सर्वच व्यक्ती / नागरीक यांची वैद्यकीय तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित तहसिलदार यांची राहील व आवश्यकते प्रमाणे संबंधित व्यक्ती/ नागरीक यांना Home Quarantine अथवा Institutional Quarantine करण्याबाबतची कार्यवाही करावी. ज्यांना Home Quarantine अथवा Institutional Quarantine करण्यात येईल त्यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 01 /05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर**
**प्रत :- जिल्हाधिकारी सर्व यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित**
**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. पोलीस अधिक्षक जळगांव
2. श्री रविंद्र भारदे, उपजिल्हाधिकारी, महसूल प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
3. श्री किरण सावंत पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी जळगांव
4. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
6. सहायक कामगार आयुक्त,जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner